अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थामध्ये पदोन्नतीपूर्वी जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग
परिपत्रक क्रमांक- सीबीसी-१०/२००४/प्रक्र-५७०/मावक-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ मार्च २००५.

वाचा :- (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रिव्हनेन्सेस अॅन्ड पेन्शन, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक -३६०३६/८/९८-ईएसटीटी ( आरईएस) दिनांक १६ मार्च १९९९.

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग, क्रमांक सीबीसी-१२/२००२/२५२/प्रक्र-१/ इमाव-५ दिनांd २५ जानेवारी २०००.

(३) शासन निर्णय सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००३/प्रक्र.९१/मावक-५ दिनांक ८ डिसेंबर २००३.

(४) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००३/प्रक्र.९१/मावक-५ दिनांक २८ जानेवारी २००४ व समक्रमांकाचे शुध्दीपत्र दिनांक ६ फेब्रुवारी २००४.

# परिपत्रक

शासकीय/निमशासकीय कार्यालये/शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/जिल्हा परिषदा/ नगरपरिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका/ ग्रामपंचायती/ मंडळे/ महामंडळे/ शासनाचे अंगीकृत व्यवसाय/ विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे/ शासकीय शिक्षण संस्था आश्रमशाळांसह/ सहकारी संस्था/ सहकारी साखर कारखाने/ सहकारी सूतगिरण्या/ बँका/ सहकारी बँका/ सहाय्यक अनुदान मिळणा-या शासनमान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/ अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/ मंडळे यांना त्यांच्या आस्थापनेवरील

EST I 10/6 9/6/04

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्गांच्या उमेदवाराकरीता राखीव असलेल्या पदावर पदोन्नती होण्यापूर्वी त्या उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची जाती दाव्याची वैधता तपासणे बंधनकारक राहील.

२. ज्या मागासवर्गीय कर्मचारी व अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापही झालेली नाही व सद्यस्थितीत पदोन्नतीच्या क्षेत्रात ( Zone Condidenation) येत असतील असे अधिकारी व कर्मचा-यांचे पदोन्नतीच्या पक्रियेपूर्वी ६ महिने अगोदर सर्व प्रशासकीय विभागाने जाती प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावी व नंतरच त्यांना पदोन्नती देण्यांत यावी. तसेच सरळ सेवा भरती प्रकरणी उमेदवाराने जाती प्रमाणपत्राची वैधता ६ महिन्यांत सादर करणे आवश्यक राहील. मात्र ही सवलत निवडणूक क्षेत्रात ( Election of Locial Bodies) लागू राहणार नाही. इच्छूक उमेदवाराने नामांकन भरण्यापूर्वी ६ महिने अगोदर आपल्या जाती प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी संबंधित जिल्हयाधिका-यांमार्फत समितीकडे अर्ज करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

सही/-
( डॉ. मुन्शिलाल गौतम)
प्रधान सचिव, सामाजिक न्याय

सत्य प्रत